लोकमत

# केमिकल इंजिनिअरिंग विभागाचे तीन विद्यार्थी गुणवत्ता यादीत

लोकमत न्यूज नेटवर्क

**यवतमाळ** : जवाहरलाल दर्डा एज्युकेशन सोसायटी संचालित येथील जवाहरलाल दर्डा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या केमिकल इंजिनिअरिंग विभागाचे तीन विद्यार्थी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत झळकले आहेत. यामध्ये मयूर धोटे, हिमांशू जुमडे, दीक्षा धुदेले यांचा समावेश आहे. त्यांनी विद्यापीठाच्या परीक्षेत गुणवत्ता यादीत दुसरे स्थान प्राप्त केले.


मयूर धोटे


हिमांशू जुमडे


दीक्षा धुदेले

विशेष म्हणजे, विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत झळकलेले पाचपैकी तीन विद्यार्थी जेडीआयईटीचे आहेत. त्यांच्या यशाचे जवाहरलाल दर्डा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष देवेंद्र दर्डा, सचिव किशोर दर्डा, प्राचार्य डॉ. रामचंद्र तत्त्ववादी आदींनी कौतुक केले.